इयत्ता-नववी　　　　　　　　　　　विषय-मराठी

संतवाणी

आ) संतकृपा झाली

-संत बहिणाबाई

शब्दार्थ :

संतकृपा- संतांचा आशीर्वाद
इमारत- वारकरी संप्रदायरुपी मंदिर
फळा आली- यशस्वी झाली
रचिला- तयार केला
पाया- भिंतीच्या खाली असलेले मूळ दगड
उभारिले- उभे केले
देवालय- मंदिर, देऊळ
तयाचा- त्याचा
किंकर- दास' सेवक
तेणे- त्यांनी
आवार- परिसर
जनार्दन एकनाथ- संत एकनाथ (जनार्दन स्वामी संत एकनाथांचे गुरु होते)
दिधला- दिला
भागवत- संत एकनाथांनी लिहिलेला ग्रंथ
तुका- संत तुकाराम
कळस- शिखर
सावकाश- हळूहळू
ध्वजा- झेंडा पताका
निरूपण- प्रवचन
बोजा- भक्तिभावाने

विरुद्धार्थी शब्द

कृपा× अवकृपा
पाया× माथा
कृपा× अवकृपा

वचन बदला

इमारत- इमारती
देवालय- देवालये
खांब- खांब
कळस- कळस

कवितेचा भावार्थ

'संतकृपा झाली' हा अभंग संत बहिणाबाई यांनी लिहिला आहे. संत बहिणाबाई वारकरी संप्रदायातील संत कवयित्री आहेत. या अभंगात त्यांनी महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायरुपी इमारत उभारणीमध्ये संतांचा मोलाचा वाटा कसा आहे, याचे स्पष्टीकरण केले आहे. हा अभंग 'सकलसंतगाथा खंड दुसरा : संत बहिणाबाईंचे अभंग' अभंग क्रमांक 32 या ग्रंथातून घेतला आहे.

संतांनी केलेल्या महान कार्याचा गौरव मंदिराच्या रुपकाद्वारे व्यक्त करताना संत बहिणाबाई म्हणतात की संतांची कृपा झाली म्हणून वारकरी संप्रदायरुपी देवालयाची इमारत आकाराला आली. फलद्रूप झाली.

संत ज्ञानेश्वरांनी वारकरी पंथाची स्थापना केली म्हणून या वारकरी संप्रदायरुपी मंदिराचा पाया संत ज्ञानेश्वरांनी रचिला. त्यानंतर हे मंदिर उभे राहिले.

संत नामदेव या मंदिरातील सेवक झाले. त्यांनी या मंदिराचा परिसर वाढवला. विस्तीर्ण आवार निर्माण केले. पंजाबपर्यंत संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार केला.

जनार्दन स्वामींचे शिष्य संत एकनाथ यांनी 'एकनाथी भागवत' हा ग्रंथ लिहून वारकरी संप्रदायरुपी मंदिराला भक्कम खांब दिला. संत एकनाथांनी या मंदिराचा डोलारा पेलला.

वारकरी संप्रदायरुपी देवालयाचा कळस होण्याचा मान संत तुकारामांकडे जातो. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने कळस चढवला. संप्रदायाला वैभव मिळवून दिले. अशा मंदिरात शांतचित्ताने, सावकाश विठ्ठलाचे भजन करा. श्रद्धेने व भक्तिभावाने मंदिराची पूजा करा.

शेवटच्या चरणात संत बहिणाबाई म्हणतात, या देवालयाची ध्वजा भक्ती व ज्ञानाच्या जोरावर फडकत आहे. मी केवळ भक्तीभावाने निरुपण केले आहे.

प्रश्न : 1. 'संतकृपा झाली' या कवितेवर आधारित दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा.

1) कवितेचे कवी / कवयित्री -
संत बहिणाबाई

2) कवितेचा रचनाप्रकार - अभंग

3) कवितेचा काव्यसंग्रह -
सकलसंतगाथा खंड दुसरा : संत बहिणाबाईंचे अभंग

4) कवितेचा विषय -
वारकरी संप्रदायाच्या इमारतीच्या उभारणीमध्ये संतांनी केलेल्या कामगिरीचे वर्णन.

5) कवितेतून व्यक्त होणारा भाव -
संतांच्या कृपेमुळे वारकरी संप्रदायाची निर्मिती आणि उभारणी झाल्याचा आनंद व अभिमान हा भाव कवितेत व्यक्त झाला आहे.

6) कवितेतून व्यक्त होणारा विचार -
वारकरी संप्रदायाच्या उभारणीत संतांनी केलेल्या कामगिरीची माहिती सांगून, आपण भक्तीभावाने या देवालयाची पूजा करावी हा विचार कवितेतून व्यक्त झाला आहे.

7) कवितेतील आवडलेली ओळ -
तुका झालासे कळस |
भजन करा सावकाश ||

8) कवितेतून मिळणारा संदेश - संतांच्या कामगिरीमुळे किंवा उपकारामुळे वारकरी संप्रदाय उभा राहिला. या संप्रदायाच्या पुढील वाटचालीची व जपवणूकीची जबाबदारी आपल्या सर्वांवर आहे.

प्रश्न : 2. 'तुका झालासे कळस |भजन करा सावकाश ||' या ओळीचा भावार्थ स्पष्ट करा.

उत्तर - 'संतकृपा झाली' हा अभंग संत बहिणाबाईंनी लिहिला आहे. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायरुपी इमारतीच्या उभारणीमध्ये संतांचा वाटा किती महत्त्वाचा आहे याचे वर्णन या अभंगात केले आहे.

संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाची स्थापना केली. संत नामदेवांनी या वारकरी संप्रदायाचा प्रचार व विस्तार केला. संत एकनाथांनी या संप्रदायाला बळकटी दिली. मजबूत आधार दिला. संत तुकारामांनी या संप्रदायाला वैभव मिळवून दिले म्हणून ते या संप्रदायरुपी मंदिराचे कळस झाले. इमारत पूर्णत्वास गेली आता आपण सर्वांनी मिळून भक्तिभावाने व सावकाश भजन करू.

अशाप्रकारे या ओळीचा भावार्थ स्पष्ट करता येतो.

प्रश्न : 3. 'ज्ञानदेवे रचिला पाया | उभारिले देवालया ||' या ओळीचा अर्थ स्पष्ट करा.

उत्तर - 'संतकृपा झाली' हा अभंग संत बहिणाबाईंनी लिहिला आहे. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायरुपी इमारतीच्या उभारणीमध्ये संतांचा वाटा किती महत्त्वाचा आहे, याचे वर्णन या अभंगात केले आहे.

संत बहिणाबाईंनी वारकरी संप्रदाय रुपी देवालय कसे निर्माण झाले हे कवितेत सांगितले आहे. संत ज्ञानेश्वरांनी या देवालयाचा पाया घातला. कोणतीही इमारत पाया मजबूत असेल तरच उभी राहते, या न्यायाने देवाच्या भक्ती बाबत लोकांना योग्य मार्गदर्शन करून आनंदाने जीवन जगत देवाला प्रसन्न करून घेता येते. असा भक्तीचा सोपा मार्ग त्यांनी सर्वसामान्य माणसाला दाखवला. आज या संप्रदायाला आठशे वर्षांची परंपरा आहे. हा संप्रदाय म्हणजे जणू भक्ती रसाचे देऊळ आहे अशी कल्पना संत बहिणाबाईंनी अभंगात मांडली आहे.

अशाप्रकारे वरील ओळींचा अर्थ स्पष्ट करता येतो.

प्रश्न : 4. संतांचे कार्य नेहमीच मार्गदर्शक ठरते, याविषयी तुमचे मत सोदाहरण स्पष्ट करा.

उत्तर - महाराष्ट्राला संतांची भूमी असे म्हटले जाते. संतांनी समाज मनावर चांगले संस्कार केले आहेत. समाजातील वाईट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांड व भोंदूगिरी यांचा संतांनी कडाडून विरोध केला आहे. आपल्या शिकवणीतून व कार्यातून समाजात समता व बंधुभाव प्रस्थापित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. 'हे विश्वची माझे घर' असा वैश्विक बंधुभाव संतांनी मानवजातीला दिला आहे. विविध जाती धर्मातील संतांनी एकतेची व सदाचाराची शिकवण दिली आहे. आज शेकडो वर्षे होऊन देखील संतांचे अभंग आपण वाचतो, अभ्यासतो ते आपल्याला आजही मार्गदर्शक ठरतात. आजच्या समाजाच्या एकूणच विकासात संतांचा असलेला वाटा विसरून चालणार नाही.

अशाप्रकारे संतांचे कार्य नेहमीच मार्गदर्शक ठरते, या विषयी माझे मत मला मांडता येते.